


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २२ डिसेंबर, १९४८ अंक ४९


दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

**स्थापनाः १९२६**

मुख्य कचेरी :

**सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

**शाखा :**

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई (१०) मांडवी–मुंबई.

**—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—**

**मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था होत आहे.**

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.






## बैलानें चालणारा व ताशी ३,००० ते १०,००० गॅलन पाणी देणारा पंप

या पंपास झीज अत्यंत थोडी असून पेट्रोल, क्रूडऑईल वगैरे याची मुळींच गरज लागत नाहीं. या पंपासाठीं वापरलेलें सर्व सामान मोटार गाडीचें असून अत्यंत मजबूत व टिकाऊ असतें. नामदार एम्. पी. पाटील, शेतकी मंत्री ( मुंबई ), मे. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, पुणें, यांनीं पंपाचें प्रात्यक्षिक पाहून समाधान व्यक्त केलें आहे. आपणही प्रत्यक्ष येऊन पंपाचें प्रात्यक्षिक पाहून खात्री करून घ्या.

**गायके आणि कंपनी, लि.**

शंकरशेट रोड, पुणें २



(मेहेरबान कलेक्टर पुणें जावक क्र. LND.·SR. VI 200 दिनांक १८ नोव्हेंबर १९४८ द्वारें सरकारी मान्यता मिळालेलें )

## सुभाष नगर

वसाहतींतील प्लॉटस् विक्री जोरांत चालू आहे.

- ★ क्षेत्रफळ ५००० पासून ८५८० स्के. फूट पर्यंत
- ★ लीज नसून संपूर्ण मालकी हक्क
- ★ पुणें स्टेशनपासून २॥ मैलांवरच
- ★ किंमत १००० पासून १७१० रुपयांपर्यंत
- ★ पुणें आळंदी रस्त्यावर
- ★ प्लॉटस् थोडे शिल्लक असल्यानें निराशा टाळण्यासाठीं ग्राहकांनीं त्वरा करावी.

अधिक माहितीसाठीं लिहा अगर भेटा—

जी. टी. गोडबोले, बी. ए., एलएल. बी.

फॉर सुभाष हौसिंग सोसायटी ( रजिस्टर्ड ) ८१३, रविवार पेठ, सतरंजीवाला चौक, लोणार आळी, पुणें २.

घरचा पत्ताः— ९९ शुक्रवार पेठ, धोंडूमामा साठे वाडा, पुणें २.

भेटण्याची वेळः—सकाळीं ८ ते ११॥ सायंकाळीं ६ ते ८॥

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु,　　बुधवार चौक
पुणें २.


## विविध माहिती

**बटाट्याचा इतिहास**—बटाटा हा पदार्थ सुमारें ४०० वर्षांपूर्वी अमेरिकेंतून युरोपमध्यें लावगडीसाठी आणला गेला. आज बटाटा म्हणजे एक प्रमुख खाद्यपदार्थ होऊन बसला आहे. उत्तर अमेरिकेंत सालीना ५० कोटी बुशेल्स ( सुमारें १३,५०,००० टन ) बटाटा पिकतो. सर्व जगांत ८ अब्ज बुशेल्स म्हणजे अंदाजें २,१६,००,००० टन बटाटा पिकतो.

**संयुक्त राष्ट्रसंघांत स्पॅनिशचा प्रवेश**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेनें इंग्लिश आणि फ्रेंच भाषेप्रमाणें स्पॅनिश भाषाही आपल्या व्यवहारासाठी मान्य केली आहे. सोव्हिएट रशिआच्या प्रतिनिधींनें रशिअन भाषेसही अशीच मान्यता देण्याची दुरुस्ती ठरावांत सुचविली. परंतु हा प्रश्न सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवर नव्हता ह्या मुद्यावर सभेच्या अध्यक्षांनीं दुरुस्ती फेटाळून लावली. स्पॅनिशला मान्यता मिळाल्यामुळें आतां सभेपुढील सर्व भाषणांचें भाषांतर स्पॅनिश भाषेंतही करावें लागेल.

**अमेरिकन बोलपटांचें परदेशी उत्पन्न**—अमेरिकन बोलपट परदेशीं दाखविण्याबद्दल जी 'रॉयल्टी' मिळते, तिच्या उत्पन्नांत १९४७ सालीं दहा टक्क्यांनीं घट झाली, असें अमेरिकेच्या व्यापार खात्यानें जाहीर केलें आहे. १९४८ सालीं हें उत्पन्न आणखीहि घटेल असा अंदाज आहे. ब्रिटननें १९४७ सालीं अमेरिकन बोलपटावरील जकात वाढविली त्यामुळें त्यांची ब्रिटनमधील आयात कमी झाली. त्यामुळें उत्पन्नांत घट झाली, असें मुख्य कारण सांगण्यांत येत आहे.

**आंतरराष्ट्रीय मजूर संघटना**—म्हैसूर सरकारनें आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या गव्हर्निंग कौन्सिलची एक बैठक डिसेंबर, १९४९ मध्यें म्हैसूर शहरांत भरविण्यांत यावी अशी विनंती केली आहे.

**मलेरिआ विरोधी मोहीम**—ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं मॉरिशस बेटांतील मलेरिआचा ताप नाहींसा करण्यासाठी बरेच प्रयोग चालविले आहेत, असें ब्रिटिश सरकारच्या वसाहतखात्यातर्फें जाहीर करण्यांत आलें आहे.

**पाकिस्तानच्या दोन रुपयांच्या नोटा**—जानेवारी १९४९ मध्यें पाकिस्तान स्टेट बँक २ रुपयांच्या नवीन नमुन्याच्या नोटा व्यवहारांत आणणार आहे, असें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.

**ब्रिटन-रशिआ व्यापार**—ब्रिटन आणि रशिआ ह्या देशांत सध्या व्यापारी करारांची बोलणीं चालू आहेत. ब्रिटननें रशियाकडे २० लाख टन धान्याची मागणी केली आहे. वाटाघाटी यशस्वी झाल्या तर येत्या चार वर्षांत ब्रिटन रशिआकडून ५० लाख ते १ कोटी टनांपर्यंत धान्य घेऊं शकेल; त्याशिवाय ब्रिटननें रशियाकडे मँगेनीज आणि फ्लॅक्सचीही मागणी केली आहे. रशिआनें लाकूड देण्याची तयारी दर्शविली आहे.

**इंग्लंडची इराकला विनंती**—इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका ह्या तीन राष्ट्रांनीं हैफामधील तेलाचे नळ इराकनें पुन्हा चालू करावे, अशी विनंती इराकी सरकारला केली आहे. गेल्या उन्हाळ्यांत हैफामधील तेल शुद्ध करणारे कारखाने ज्यू सरकारच्या हातीं पडल्यावर इराकनें नळांतील तेलाचा प्रवाह थांबविला होता. हैफामधील तेलाच्या पुरवठ्यावर युरोपच्या पुनर्घटनेचा कार्यक्रम अवलंबून आहे, असें म्हणतात.

**नवीन भांडवलाला परवानगी**—ऑक्टोबर १९ ते नोव्हेंबर २० ह्या तारखांचे दरम्यान एकूण ३२ कंपन्यांना मिळून १४, २९, ८४, ५५० रुपयांचें भांडवल उभारण्याची परवानगी देण्यांत आली. त्यापैकीं शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीला आणखी ५ कोटी रुपये भांडवल उभारण्याची परवानगी मिळाली. वृत्तसंस्था चालविण्यासाठी प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिआ, मद्रास, ह्या कंपनीला १० लाख रुपये भांडवल उभारण्याची परवानगी मिळाली.

**अमेरिकेंत धूम्रपान फैलावत चाललें**—अमेरिकेंतील लोक पाइप आणि सिगारेट अधिक ओढूं लागले आहेत. त्याला चार कारणें मुख्यतः सांगण्यांत येत आहेतः—( १ ) अधिकाधिक बायका धूम्रपान करूं लागल्या आहेत. ( २ ) अल्पवयांत सिगारेट ओढणाऱ्यांची संख्या वाढत आहे. ( ३ ) सध्यांच्या एकंदर किंमतींच्या मानानें सिगारेटसूची किंमत अल्प आहे. ( ४ ) युद्धांतील मानसिक ताणामुळें बरेच लोक सिगारेट ओढू लागले आहेत. अमेरिकेंत १९३९ सालीं जितक्या सिगारेटस् खपत होत्या त्यापेक्षां आज दुपटीनें अधिक खपतात. ह्यांत अमेरिकेबाहेर असलेल्या अमेरिकन सैनिकांचाहि अंतर्भाव केलेला आहे. गेल्या जुलैमध्यें प्रत्येक पाकिटाची किंमत १ सेंटनें वाढविण्यांत आली पण त्याचा ग्राहकांवर विशेष परिणाम झाला नाहीं.

**जपानसाठी हिंदी कोळसा**—युद्ध संपल्यानंतरही हिंदुस्थान—जपानचें दळणवळण नीटसें सुरू झालेलें नाहीं. तथापि, जपानला, हिंदुस्थानांतील कोळसा नेण्यासाठी दोन बोटी लवकरच एका मागोमाग एक येणार आहेत. प्रत्येक बोट सुमारें ८,००० टन कोळसा घेऊन जाईल. कोळसा जपानी बोटींतून नेल्यामुळें जपानच्या सरकारची १,२०,००० डॉलर्सची बचत होईल.

**झेकोस्लोव्हाकिआ व रशिया ह्यांचा व्यापार**—झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारच्या कापड-गिरण्यांच्या खात्यानें सोव्हिएट रशिआशीं २ कोटी, २५ लाख पौंड किंमतीची उलाढाल करणारा करार केला आहे. ह्या कराराप्रमाणें रशिआनें झेक सरकारला ४५ हजार टन कापूस द्यावयाचा असून त्याबद्दल ८ हजार ते १० हजार टन तयार कापड द्यावयाचें आहे. झेकोस्लोव्हाकिआच्या अलीकडील परदेशी व्यापारांत हा मोठ्यांत मोठा सौदा आहे.


तयार कपड्यांचे　**महिंद्रकर ब्रदर्स**　बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
-खादीचें माहेरघर-

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ११ डिसेंबर १९४८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## निर्गत व्यापारांतील प्रतिकूल तफावत

निर्गत सल्लागार मंडळापुढें २२ नोव्हेंबर रोजीं व्यापार मंत्र्यांनीं भाषण करून, कष्टसाध्य चलनाच्या देशांशीं चालणाऱ्या निर्गत व्यापाराच्या परिस्थितीची चर्चा केली. जून ते ऑगस्ट ह्या तिमाहीचा विचार केला असतां अमेरिकेशीं चालणाऱ्या व्यापारांत तूट येत आहे. ह्या तिमाहीच्या हिशेबावरून अमेरिकेशीं येणारी वार्षिक तूट जवळ जवळ दहा कोटी डॉलर्सची होईल. १९४७ सालींहि अखंड हिंदुस्थानचा अमेरिकेशीं व्यापार तुटीचाच झाला होता. हिंदचा जानेवारी महिन्यांत अमेरिकेशीं प्रतिकूल तफावत दर्शविणारा व्यापार झाला. परंतु, पुढील चार महिन्यांत म्हणजे मे अखेरपर्यंत वार्षिक तीन कोटी ह्या प्रमाणांत अनुकूल तफावत राहिली. परंतु नंतरच्या तीन महिन्यांत पुन्हां प्रतिकूल तफावत, उल्लेखिल्याप्रमाणें, राहात गेली.

कष्टमय चलनाच्या देशांशीं व्यापार करतांना अनुकूल तफावत राहील, निदान आजच्याप्रमाणें प्रतिकूल तफावत राहाण्याचें बंद होऊन व्यापारांत परस्पर तोंडमिळवणी होऊं शकेल, ह्यासाठी हिंद सरकारनें प्रयत्न केले पाहिजेत, निर्गत वाढविणें हा एक उपाय आहे व त्याचबरोबर ह्या देशांकडून होणारी आयात कमी करणें हा दुसरा उपाय. ह्या दोनहि उपायांची अंमलबजावणी होईल तरच ह्या बाबतींतील परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति सुधारत जाईल. हे उपाय सुचविणें सोपें आहे, परंतु आजच्या परिस्थितींत त्यांची अंमलबजावणी कितपत करतां येईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

एक अडचण म्हणजे यंत्रसामुग्री व अन्नधान्य ह्या बाबतींत कष्टसाध्य चलनाच्या देशांवर आपणाला अवलंबून राहावें लागत आहे. त्या बाबतींत सुधारणा करावयाची म्हणजे सहजसुलभ चलनाच्या देशांतून यंत्रसामुग्री व अन्नधान्य यांची आयात करणें. परंतु, सहजसुलभ चलनाचे देश अन्नधान्य पुरवूं शकत नाहींत व यंत्रसामुग्री पुरविण्याच्या बाबतींतहि त्यांची परिस्थिति विशेष समाधानकारक नाहीं. नुकतेंच डालमिया शेटजींनीं सुचविल्याप्रमाणें, अन्नाच्या आयातीवर यापुढें जास्त पैसा खर्च करणें, हें आपल्या अर्थव्यवस्थेला नुकसानकारक ठरणार आहे. अन्नधान्याची आयात कमी करावयाची म्हणजे अंतर्गत उत्पादन वाढविलें पाहिजे. नुकत्याच येऊन गेलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळें चालू वर्षी अन्नविषयक उत्पादनाची अंतर्गत परिस्थिति विशेष सुधारण्याची फारशी आशा नाहीं. आयातीवरील निर्बंध, चलनवाढीविरुद्ध उपाययोजना म्हणून, सरकारकडून जास्त प्रमाणांत ढिले केले जात आहेत. त्यामुळें अन्नधान्याव्यतिरिक्त इतर मालाच्या आयातीला उत्तेजन मिळत आहे. ही घटना कष्टसाध्य चलनाच्या देशांशीं व्यापारी वजावटींत तोंडमिळवणी साधण्याच्या दृष्टीनें, उत्साहजनक नव्हे. निर्गतीची परिस्थिति सुधारतां येईल का, हा दुसरा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या बाबतींत फक्त तागाच्या पक्क्या मालाची निर्गत वाढविण्याची कांहींशी शक्यता दिसते. ही निर्गत वाढवावयाची म्हणजे तागाच्या धंद्याला कांहीं विशेष सवलती द्याव्या लागणार. ह्या सवलती द्यावयाच्या म्हणजे पाकिस्तानशीं कच्च्या तागाच्या खरेदीबद्दल संबंध येतो व तागाच्या धंद्यांतील मजुरांचाहि संबंध येतो. सारांश, परिस्थिति बिकट दिसते.

## चलनवृद्धीविरुद्ध सरकारी उपाय

### प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांचे विचार.

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांचें सध्यांच्या आर्थिक परिस्थितीवर नाशिक येथील रोटरी क्लबमध्यें भाषण झालें. ते म्हणाले, " सध्यांची चलनवृद्धि हा युद्धखर्च चालविण्याच्या पद्धतीचा परिणाम आहे. सामान्य मोणसाच्या अनुभवाला ही चलनवृद्धि एकाच प्रकारानें येत आहे आणि तो म्हणजे किंमतींत झालेली वाढ. ह्या किंमतींना आळा घालण्यासाठी सरकारनें कांहीं तरी केलें पाहिजे. जनतेचा विश्वास संपादन करण्याचा तो एकच मार्ग आहे. सरकारनें अलीकडे हळुहळु नियंत्रणें बसाविण्याचें जें धोरण स्वीकारलें आहे तें यशस्वी होणार नाहीं अशी भीति मला वाटतें. इतर देशांतून विनियंत्रणाचें धोरण टप्याटप्यानें अंमलांत आणलें गेलें आणि प्रत्येक वेळीं विनियंत्रणाचे परिणाम काय होतात ह्यावर लक्ष ठेवण्यांत आलें. उलट, नियंत्रणाचें धोरण मात्र द्रुतगतीनें अमलांत आणलें गेलें. नियंत्रणाच्या योजना ह्या तपशिलवार ठरविण्यांत याव्या; शिवाय त्या गुप्त रीतीनें तयार करून एकदम अमलांत आणाव्या; म्हणजे व्यापारी जुगाऱ्यांना त्या धोरणाचा फायदा घेण्याला अवसरच मिळणार नाहीं.

"हिंदुस्थान सरकारनें मी सांगितलेल्या पद्धतीच्या बरोबर उलट पद्धत स्वीकारली. सरकारनें विनियंत्रणाची योजना एका आठवड्यांत जारी केली. नियंत्रणें बसविण्यापूर्वी मात्र एक वर्षाची आगाऊ सूचना देण्यांत आली. माझ्या दृष्टीनें पुढील चार महिने आर्थिक दृष्ट्या फारच आणीबाणीचे आहेत. मार्च आणि एप्रिल ह्या महिन्यांत सामान्यतः पिकाची कापणी–मळणी संपलेली असते. त्याचवेळीं धान्याच्या किंमती वाढतात. त्यावेळीं त्यांच्या किंमतींना पायबंद घालण्याचे प्रयत्न केले तर ते फार उशिरा केलें असें ठरेल; आणि एकदां कां किंमती भडकल्या कीं मग औद्योगिक तह, नफ्याची विभागणी, किमान पगार आणि नफ्यावर नियंत्रण इत्यादी भाषा शुष्क बडबड ठरल्याशिवाय रहाणार नाहीं. सध्या कशाची गरज असेल तर लोकांच्या विश्वासाची; आर्थिक परिस्थिति सरकारच्या पूर्णपणें आटोक्यांत आहे अशी लोकांची प्रत्यक्ष अनुभवानें खात्री पटली पाहिजे. "

---

**कॅनडाकडून गहूं मिळणार**—येत्या एप्रिलपर्यंत कॅनडाकडून हिंदुस्थानाला ६० लक्ष बुशेल उत्तम प्रतीचा गहूं मिळणार आहे असें समजतें. ह्याहीपेक्षा आधिक गहूं मिळण्याची शक्यता असून त्याबदली हिंदुस्थान सरकार डॉलर्स देणार आहे.

**ब्रिटिश मुख्य प्रधानांना घर पाहिजे**—इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. ॲटली स्वतःला रहाण्यासाठी एका घराच्या शोधांत आहेत. ते मुख्य प्रधान आहेत तोंपर्यंत त्यांना १०, डाउनिंग स्ट्रीट येथें रहाता येईल. त्याच प्रमाणें बकिंगहॅम शायरमध्यें एक लहानसें घरहि त्यांच्या दिमतीला आहे. १९४५ सालीं मि. ॲटली मुख्य प्रधान झाल्यावर त्यांनीं लंडनमधील आपलें लहानसें घर विकून टाकलें. इंग्लंडचें सरकार जर बदललें तर त्यांना घर पहावें लागणार हें उघडच आहे.

# हिंदी कापड धंद्याचें "यूनो"च्या तज्ज्ञांकडून परीक्षण

## महत्त्वाचा प्रगतीपर धंदा

### निरीक्षकांचीं अवलोकनें व सूचना

( श्री. स. वा. दातार. )

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या, आशिया व अतिपूर्वेकडील देश ह्या विभागाच्या आर्थिक समितीची बैठक ऑस्ट्रेलियांत लॅप्स्टन् येथें भरली होती. यूनोच्या तज्ज्ञ निरीक्षक मंडळानें हिंदुस्थान, पाकिस्तान, ब्रम्हदेश, सीलोन, चीन, इंडोचायना, इंडोनेशिया आणि फिलिपाइन्स ह्या देशांतील कारखानदारी धंद्यांची पहाणी करून तयार केलेला अहवाल वरील बैठकीपुढें ठेवण्यांत आला होता. त्या अहवालामुळें हिंदुस्थानविषयक बरीच उपयुक्त माहिती उपलब्ध झाली आहे.

### निरीक्षकांचीं अवलोकन

गुंतविलेलें भांडवल, कामगारांची संख्या आणि उत्पादित मालाची किंमत ह्यांचे दृष्टीनें कापड गिरण्यांचा धंदा हा हिंदुस्थान व चीन या दोन देशांतील सर्वांत अधिक महत्त्वाचा कारखानदारी धंदा आहे. ह्या दोन देशांना मुख्यतः सुती कापडाचें उत्पादन वाढविण्याची फारच आवश्यकता असून त्याला फार मोठा वाव आहे; व धंद्याच्या अपेक्षित वाढीला म्हणण्यासारख्या अडचणीहि नाहींत. निरीक्षकांचे मतानें येत्या कांहीं वर्षांत कापसाचा भरपूर पुरवठा जगांत सर्वत्र होण्यासारखा असून, प्रस्तुत देशांच्या मर्यादेंत सुद्धां युद्धकाळांत कमी झालेलें कापसाचें उत्पादन वाढविता येण्यासारखें आहे. कामगार भरपूर मिळतील. यंत्रसामुग्री झिजून गेलेली व जुनाट पद्धतीची आहे ही मोठी अडचण आहे खरी; पण तीसुद्धां दूर करता येण्यासारखी आहे. उपलब्ध यंत्रसामुग्रींत फेरफार व दुरुस्त्या करून आणि कार्यपद्धति व व्यवस्थापद्धति यांच्यांत सुधारणा करून ही अडचण कांहीं अंशीं दूर होऊं शकेल. कांहीं यंत्रसामुग्री येथेंच बनवता येईल व कांहीं मात्र आयातच करावी लागेल. जपानमध्यें सध्यां कांहीं यंत्रसामुग्री उपलब्ध आहे तिचा आणि जपानी यांत्रिक उत्पादनाची कार्यक्षमता यांचाहि उपयोग होण्यासारखा आहे.

### हिंदी कापड गिरण्या

सध्यां हिंदुस्थानांत कापड गिरण्या हींच सर्वांत मोठी कारखानदारी आहे. तिजमध्यें १०० कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे. सुमारे ५ ते ६ लक्ष कामगार काम करीत आहेत व वार्षिक उत्पादनाची सरासरी किंमत सुमारे ४०० कोटी रुपये आहे सुमारे १ कोटी, १ लक्ष चात्या व २ लक्ष माग वापरांत असून त्यावर १६१ कोटी ५० लक्ष रत्तल सूत आणि ४७० कोटी वार कापड प्रतिवर्षी तयार होत आहे. गिरण्यांची गरज भागवून उरणारें सूत मुख्यतः हातमागांना देण्यांत येतें व त्यापासून प्रतिवर्षी सुमारें १२० कोटी वार कापड तयार होतें. अन्नाच्या खालोखाल कापडाचीच हिंदुस्थानची गरज फार मोठी व महत्त्वाची आहे; परंतु दुर्दैवानें १९४५ सालापासून कापडाची पैदास कमीकमीच होत जात आहे. १९४५ सालीं कापडाची पैदास ४६९ कोटी वार होती ती १९४७ सालीं ३८४ कोटींवर आलेली आहे.

### घटीचीं प्रमुख करणें

( १ ) संप, टाळेबंदी, गैरहजेऱ्या, मजुरांकडून कामांत ढिलाई व हेतुपुरस्सर मंद काम आणि जातीय दंगे, ( २ ) प्रत्येक पाळींतील कामाचे तास ९ वरून ८ वर आणले गेले ( ३ ) व गिरणीमालकांची तलम कापड काढण्याकडे वाढती प्रवृत्ति ही उत्पादनांतील घटीचीं प्रमुख्य कारणें आहेत. सुमारें १० टक्के घट कामाचे तास कमी केल्यामुळें, सुमारें ५ ते ८ टक्के घट संप, हरताळ, कामांतील ढिलाई यांचेमुळें आणि सुमारे ३ ते ४ टक्के घट तलम कापड काढल्यामुळें पडलेली आहे. ( ४ ) चवथें उत्पादनघटीचें कारण म्हणजे झिजलेली यंत्रसामुग्री व सुट्या पूरक भागांचे दुर्भिक्ष हें होय. १९३९ सालापासून यंत्रसामुग्री व तिचे आवश्यक पूरक भाग यांची म्हणण्यासारखी आयात अजूनपर्यंत झालेली नाहीं. त्यामुळें चालू यंत्रसामुग्रींपैकी सुमारें ४० टक्के यंत्रें नवी बसविण्याची निकड लागलेली आहे.

### उत्पादन वाढीचे कार्यक्रम

सध्यां हिंदुस्थान सरकारनें स्वीकारलेल्या उत्पादनवाढीच्या कार्यक्रमानुसार ४८ लक्ष जादा नव्या चात्या बसविल्या जाणार आहेत. म्हणजे १७० कोटी वार कापडाची दरवर्षी जादा पैदास होऊं शकेल व कापडाच्या वार्षिक उत्पादनाचा आंकडा ६७० कोटी वारावर जाईल. कापडाची जादा पैदास होणें ही गोष्ट सुताची पैदास वाढविण्यावर अवलंबून असते. त्यांसाठीं १९४७ सालीं इंग्लंडांतून २ लक्ष व स्वित्झरलंडहून १२ हजार चात्या मागविण्यांत आलेल्या आहेत. शिवाय ४० हजार जुन्या चात्या इंग्लंडमधून दुरुस्त करून मिळणार आहेत. वरील सर्व आंकडे जमेस धरून आतां १९४८ सालीं एकूण ४ लक्ष, ७ हजार नव्या चात्या येणार असून १० हजार दुरुस्त केलेल्या चात्या येणार आहेत. या नव्या कार्ययोजनेमुळें उत्तम $\frac{3}{4}$ इंच धाग्याच्या कापसाच्या एकूण पंधरा लक्ष गाठी हिंदुस्थानाला प्रतिवर्षी लागतील. पैकीं हिंदुस्थानांत फक्त ५ लक्षच गाठी कापूस पैदा होऊं शकतो; तेव्हां बाकीचा १० लक्ष गाठी कापूस आयात करावा लागेल.

---

**जकातीचें उत्पन्न वाढलें**—चालू फडणिशी वर्षांत हिंदुस्थान सरकारला आयात जकातीचें उत्पन्न ३० कोटी रुपयांनीं अधिक येईल असा अंदाज आहे. ऑक्टोबर १९४८ अखेर संपलेल्या पहिल्या सात महिन्यांतच जकातीचें उत्पन्न ६०,४२, १३,००० रुपये झालें. संपूर्ण फडणिशी वर्षांत हें उत्पन्न ८०, ७६,००,००० रुपये होईल असा अंदाज करण्यांत आला होता. ऑक्टोबरपासूनच आयातीच्या हंगामाला भर येतो. शिवाय आयातीच्या सर्वसाधारण परवान्यांतील वस्तूंची यादीही अधिक विस्तृत केलेली आहे. त्यामुळें चालू वर्षी १०० कोटी रुपयांवर आयात जकातीचें उत्पन्न होईल असा अदमास आहे.

**ग्रिंडलेज बँकेच्या भागांची मालकी**—नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँक आणि नॅशनल बँक ऑफ इंडिआ ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें ग्रिंडलेज बँकेचें पहिल्या बँकेकडे असलेलें भांडवल दुसऱ्या बँकेनें घेण्याचें ठरविलें आहे. १९२४ सालापासून ग्रिंडलेज बँकेचे भाग नॅशनल प्राव्हिन्शिअल बँकेनें घेतलेले होते. भांडवल २,५०,००० पौंडांचें व प्रसिद्ध केलेले रिझर्व्हज १,००,००० पौंडांचे आहेत. ठेवी २ कोटी पौंडांच्या आहेत. त्यामानानें भांडवल व रिझर्व्ह ह्यांचे आकडे वाढविण्यांत येणार आहेत. कराराला जरूर तेथें ब्रिटिश सरकारची मंजुरी घेण्यांत येईल.

## किर्लोस्कर बंधु, लिमिटेड.

### अध्यक्षीय भाषणांतील उतारे

( ता. ११-१२-१९४८ रोजीं झालेल्या भागीदारांच्या सर्वसाधारण सभेपुढें अध्यक्ष श्री. जगन्नाथ महाराज पंडित ह्यांनीं केलेल्या भाषणांतील व्यापक व महत्त्वाच्या प्रश्नांचा परामर्श "अर्था"च्या गेल्या अंकांत घेण्यांत आला आहे. भाषणांतील कांहीं उतारे येथें दिले आहेत. )

"राष्ट्रपित्याच्या अमानुष वधामुळें देशांत दंगल माजली. विशेषत: दक्षिण महाराष्ट्रांत हाहा:कार झाला. महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांना त्यामुळें जबरदस्त धक्का बसला. पण ह्याही संकटांतून आपल्या कंपनीनें मार्ग काढला. पूज्य महात्माजींच्या कार्यास भरीव व कायम स्वरूप देण्याकरतां उभारलेल्या स्मारकनिधीस कंपनीतर्फे रुपये १५,०००/- ( रु. पंधरा हजार ) देणगीची तरतूद १९४७-४८ चे अहवालांत केली आहे. कंपनीचे कामगार, स्टाफ व मॅनेजमेंट यांनीं या निधीस स्वयंस्फूर्तीनें अंदाजें पंचवीस हजार रुपये देण्याचा संकल्प केला असून त्यापैकीं कांहीं रक्कम निधीसमितीकडे पाठविली आहे.

"१९४७-४८ सालच्या अहवालाकडे नजर टाकल्यास कांहीं ठळक गोष्टी चटकन डोळयापुढें येतात. चालू वर्षी कारखाना अकरा महिने चालू असूनसुद्धां नफ्याचें मान गुदस्तापेक्षा जें अधिक दिसतें त्याचें कारण मुख्यत: मालाच्या किंमतींत वाढ हें आहे. परंतु याच किंमती पुढें ठेवतां येतील किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. युद्धोत्तर काळांत प्रत्यक्ष युद्धकालापेक्षांही अधिक अडचणींच्या प्रसंगांतून आपल्या कंपनीस मार्ग काढावा लागला. अशावेळीं संचालकांचें कुशल नेतृत्व कंपनीस यश देण्यास कारणीभूत झालें हें आपणांस माहीत आहे. अद्यापीही फार महत्त्वाचे प्रश्न कंपनीपुढें आहेतच.

"नुकत्याच संपलेल्या युद्धामुळें सर्व जगभर आर्थिक घडी विस्कळीत झाली आहे आणि त्यांत सुधारणा होण्याचें अद्यापीही चिन्ह दिसत नाहीं. चलनवाढ थांबलेली नाहीं. त्यांतच अनिश्चित राजकीय वातावरण, सरकारचें कामगारविषयक धोरण, यांची भर पडली आहे. ह्या भोंवतालच्या परिस्थितीचा परिणाम आपल्या कारखान्यावरहि झालेला आहे.

"नवीन यंत्रसामुग्रीकरतां लागणारी रक्कम, विलीनीकरणामुळें उत्पन्न झालेल्या आर्थिक जबाबदाऱ्या, कच्च्या मालाकरितां अगाऊ भरलेल्या व अडकून पडलेल्या मोठ्या रकमा आणि स्पष्ट दिसत असलेली आगामी आर्थिक मंदी, या सर्व गोष्टींचा विचार करतां आपणांजवळ असलेली व आतांपर्यंत जमविलेली पुंजी ("रिसोर्सेस") आपण खर्च न करतां, वांटून न टाकतां, जतन करून ठेवणेंच इष्ट आहे. ही गोष्ट आपणांसही पटेल. वरील सर्व अडचणींचा विचार व्यवस्थापक करीत आहेतच आणि याही परिस्थितींमधून आपण पार जाऊं असा आमचा भरंवसा आहे व आपल्या सहकार्यानें हें काम सोपें होणार आहे.

"कामगारांचे बाबतींत आपल्या कंपनीचें धोरण नेहमींच उदार व समतोलपणाचें असतें. ह्याचें अगदीं ताजें उदाहरण म्हणजे वेतनसमतोलपणाचें असतें. ह्याचें अगदीं ताजें उदाहरण म्हणजे वेतनवाढीचा प्रश्न "सब ज्युडीस" असतांनासुद्धां व्यवस्थापकांनीं नोकरवर्गास पगारवाढ दिलेली आहे. कामगारांच्या सुखसोयीकरतां सरकारनें केलेल्या योजनांचे बाबतींत कंपनीचें धोरण नेहमींच सहकार्याचें असतें आणि मला सांगण्यास आनंद वाटतो कीं, कामगारांच्या सुखसोयी व सुधारणा या बाबतींत आपल्या कंपनीचा अनुक्रम फारच वरचा आहे. तथापि, वेतनश्रेणी ठरवितांना फारच सावधगिरी बाळगणें आवश्यक झालें आहे. कारण, सध्यां परिस्थिति फारच अनिश्चित व अस्थिर आहे. भावी काळांत वस्तूंचे भाव कसे काय राहतील याचा अंदाज करणें कठीण आहे. इतकेंच नाहीं, तर येणार येणार अशी कल्पना असलेल्या मंदीचीं चिन्हें आज स्पष्ट दिसत आहेत. आपल्या कारखान्याच्या कांहीं मालाकरितां येणारी मागणी निश्चित कमी झाली असून जर अशीच परिस्थिति चालू राहिली तर कारखान्याचा उत्पादनाचा कार्यक्रम बदलावा लागतो किंवा काय, अशी चिंता आजच व्यवस्थापकांना उत्पन्न झाली आहे."

---

कांहीं विशिष्ट प्रकारच्या सोसायट्यांचें ऑडिट

### होऊं घातलेला नवा सहकारी कानू

( ह्या मसुद्यास कोणाचा विरोध असल्यास किंवा सूचना करावयाच्या असल्यास, त्या ३ जानेवारी १९४९ पूर्वी सरकारला मिळाल्या पाहिजेत. )

"इंडियन कंपनीज ॲक्टाखालीं ज्यांचेजवळ सर्टिफिकेट आहे अशा, रजिस्ट्रारनें नेमलेल्या सर्टिफाइड ऑडिटराकडूनच खालील प्रकारच्या सोसायट्यांनीं आपले हिशेब तपासून घेतले पाहिजेत:—

( अ ) ५० हजारांचे वरील उलाढालीच्या कंझ्युमर्स सोसायट्या,

( ब ) ५० हजारांचेवर खेळतें भांडवल असलेल्या 'अ' किंवा 'ब' वर्गीत असलेल्या अर्बन बँका,

( क ) ज्यांनीं सरकारी कर्जाचें देणें बाकी नाहीं, अशा हाउसिंग सोसायट्या,

( ड ) रजिस्ट्रारनें जाहीर केलेली इतर कोणतीहि सोसायटी.

"कोणत्याहि सोसायटीचे हिशेब कोणत्याहि वर्षी किंवा ठराविक कालांतरानें सरकारी ऑडिटराकडून तपासून घेण्याचा अधिकार रजिस्ट्रारकडे राहीलच. ज्या सर्टिफाइड ऑडिटराकडे हिशेब तपासणीचें काम सोसायटीनें दिलें असेल त्याचें नांव रजिस्ट्रारला दरवर्षी १ नोव्हेंबर पूर्वी कळविलें पाहिजे. असें नांव रजिस्ट्रारकडे वेळेवर पोंचलें नाहीं तर तो स्वत:च कोणत्याहि ऑडिटरची नेमणूक करून त्याचे मार्फत हिशेब तपासणी करवील."

---

**डेक्कन क्वीन फक्त पहिल्या वर्गासाठीं**—१ जानेवारी, १९४९ पासून, डेक्कन क्वीनमध्यें फक्त पहिल्या वर्गाचे उतारू व त्यांचे नोकर ह्यांसच जागा मिळेल. दुसऱ्या वर्गाचे डबे गाडीस जोडण्यांत येणार नाहींत.

**ज्वाला बँकेवरील ठेवी-बंदीचा हुकूम**—ज्वाला बँक लि. वर बँकिंग कंपनीज ऑर्डिनन्सखालीं हुकूम बजावून तिला नव्या ठेवी घेण्यास बंदी करण्यांत आली होती. बंदीचा हा हुकूम बेकायदा ठरवून बँकेस ५० लक्ष रु. नुकसानभरपाई आणि १२ एप्रिल १९४८ पासून दरमहा २५,००० रु. आणखी नुकसानभरपाई मिळावी, असा बँकेनें मुंबई हायकोर्टांत अर्ज केला आहे. बँकेच्या चेअरमननें ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवीइतकी रक्कम रिझर्व्ह बँकेकडे ठराविक वेळांत ठेवण्याची तयारी पत्र लिहून दर्शविली होती, परंतु ती अमान्य करण्यांत आली, असें हायकोर्टांत सांगण्यांत आलें. १ मार्च, १९४९ रोजीं अर्जाचा विचार होईल.

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

व्याख्यान पांचवें (१०-११-४८)

## औद्योगिक सहकारी संस्था

( श्री. वाय. जी. धर्माधिकारी )

वरील विषयावर श्री. धर्माधिकारी यांचें भाषण झालें. ते म्हणाले, "सहकारी सोसायट्यांचा १९०४ चा कायदा हा सर्वस्वी पतपेढ्यांचेसाठींच होता. त्या कायद्याचें क्षेत्र पुष्कळच मर्यादित होतें. या कायद्याची जरूरीप्रमाणें वाढ करून तो पुन्हा सन १९१२ व १९२५ सालीं मंजूर झाला. तथापि या कायद्यांचा मुख्य भर शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीची सुधारणा करण्यावरच होता व तें स्वाभाविकही आहे. कारण हिंदुस्थानांतील बहुसंख्य समाज हा शेतकरीच आहे.

"तथापि आपल्या समाजांतलि शेंकडा १०-१२ टक्के लोक हे कारागीर, धंदेवाले हरहुन्नरी असे आहेत. हा वर्ग शारिरीक कष्ट करून आपली उपजीविका करीत असतो. परंतु हे लोक व शेतकरी समाज यांच्या आर्थिक परिस्थितींत फारच मोठा फरक आहे. बहुतेक सर्व शेतकऱ्यांच्या मालकीची थोडी फार स्थावर मिळकत असते. परंतु या कारागिराजवळ अशा प्रकारची जिनगी नसल्यानें त्यांना उद्योगधंद्यास लागणारें भांडवल मिळणें फार कठीण होतें सबब हा वर्ग संघटित होऊन एकमेकांस मदत करण्यास तयार झाल्याशिवाय त्यांची आर्थिक गरज खाजगी सावकार अगर सहकारी सोसायट्या किंवा बँका यांचेकडून भागवली जात नाहीं असा अनुभव आहे. सबब ह्या वर्गास प्रथमावस्थेंत तरी सरकारनें आर्थिक मदत केली पाहिजे. जों जों हा वर्ग स्वावलंबी, स्वयंपोषित व एकमेकांस सहाय्य करण्यास तयार होईल तों तों सरकारनें आपली मदत—प्रत्यक्ष मदत-करण्याचे कमी कमी करावे व त्याऐवजीं त्यांना अप्रत्यक्ष, आर्थिक व शैक्षणिक मदत करण्याचें धोरण ठरवावें.

"घरगुती व लहान प्रमाणावर चाललेले खेडेगांवांतील उद्योगधंदे यांची वाढ कशी होईल याकडे सरकारचें आजवर योग्य तें लक्ष गेल्याचें दिसून येत नाहीं. परंतु आतां बदललेल्या राजकीय परिस्थितीचा ह्याही बाबीवर परिणाम झाला असून आपलें सरकार या उद्योगधंद्याकडे आपुलकीच्या व सहानुभूतीच्या भावनेनें पाहूं लागलें आहे.

"आपला कारागीर वर्ग हा नवमतवादी नसल्यानें तो आपला धंदा पूर्वापार पद्धतीनें व साधनांनींच करीत राहिला आहे. नवीन नवीन सुधारणा व यांत्रिक सहाय्य या साधनांनीं आपल्या धंद्याची वाढ व प्रगति कशी होईल याचा तो विचारच करीत नाहीं असें दिसतें. सबब त्यांना तज्ज्ञाचा जरूर तो सल्ला व त्यांच्या धंद्यासाठीं लागणारें विशिष्ट प्रकारचें शिक्षण व ज्ञान शक्य तर त्यांच्या गांवीं किंवा गांवाशेजारी सहजी उपलब्ध व्हावयास पाहिजे. सरकारनें यासाठीं सुमारे ऐशीं स्थायिक अगर फिरत्या औद्योगिक शाळा स्थापन केल्या असून त्यांचे करवीं विणकाम, ओतकाम, कातडीं कमावणें, जोडे-बूट वगैरे तयार करणें, तेल काढणें, वगैरे उद्योगधंद्यांचें शिक्षण देण्याची तजवीज केली आहे.

"सरकार आजवर वैयक्तिक कारखानदारास अगर कारागिरास थोडीफार आर्थिक मदत देत असे. परंतु त्याचा उपयोग सर्वसाधारण कारागीर वर्गास जितका व्हावयास पाहिजे तेवढा होत नाहीं असा अनुभव आहे. कारण व्यक्ति ही स्वतःचे फायद्याकडे सामुदाईक हितापेक्षां अधिक लक्ष देते व तें स्वाभाविकही आहे. सबब यापुढें, अशी मदत शक्य तो व्यक्तिसंघास करावी असें सरकारनें धोरण ठरविलें आहे. शिवाय त्यामुळें या वर्गांत हळूहळू स्वावलंबन, संघटन, काटकसर, इत्यादि गुण आपोआपच निर्माण होऊं शकतील.

"कारागिरांना आपलें काम व व्यवसाय सामुदाईक पद्धतीनें करण्यास जरूर तें सहाय्य, कारागिराखेरीज इतर सहानुभूतीनें त्याकडे पहाणाऱ्या इसमांचें, घेतां यावें म्हणून कारागिरांच्या संस्थांना अशा इसमांना थोड्या प्रमाणांत आपले सभासद करून घेतां येतें. अशा सभासदांची उद्योगधंदे वाढविण्याचे कामीं बरीच मदत झालेली आहे असें अनुभवास येत आहे.

"कारागिरांनीं संघटितपणें माल उत्पन्न केल्यास तो चांगल्या प्रतीचा व किंमतींत स्वस्त असा होऊं शकतो. मात्र तो माल फायदेशीर रीतीनें कसा व कोठें विकावा यासंबंधीं त्यांना जरूर तें ज्ञान असूं शकत नाहीं. सबब अशा रीतीनें उत्पन्न होणाऱ्या मालाची योग्य प्रकारें विक्री करण्यासाठीं त्यांना जरूर तो सल्ला व मदत सरकारनें दिली पाहिजे. नाहींतर मालाचें उत्पादन वाढूनही त्याचा फायदा कारागिरांना मिळणार नाहीं, अशी परिस्थिति निर्माण होण्याचा संभव आहे. हल्लीं सर्वच मालास तेजी असल्यानें ही अडचण तुर्त भासत नाहीं. परंतु मंदीच्या काळांत ती बऱ्याच प्रमाणांत जाणवेल असें समजून आतांपासूनच त्याबाबत योग्य ती व्यवस्था सरकार व कारागिरांच्या सहकारी संस्था या दोघांनीं करावयास पाहिजे.

"घरगुती उद्योगधंद्यापासून उत्पन्न होणारा माल हा यांत्रिक पद्धतीनें व मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या मालापेक्षां नेहमींच महाग पडतो असा अनुभव आहे, व त्यामुळें घरगुती मालास पुरेसें गिऱ्हाईक मिळत नाहीं. विशेषतः हस्तीदंती अगर चंदनाच्या वस्तूंना आपल्या देशांत योग्य व पुरेशी किंमत येत नाहीं. परंतु त्या युरोप अगर अमेरिका खंडांत पाठविल्यास त्यांचा उठाव चांगला होऊन कारागिरांना दोन पैसे अधिक मिळतात असा अनुभव आहे. परदेशांतलि बाजारांत या वस्तूंचा खप कसा वाढेल याचा तज्ज्ञांनीं विचार करून त्याबाबतचा सल्ला कारागिरांना त्यांनीं जरूर दिला पाहिजे. म्हणजे मग कारागीर त्या सल्यानुसार आपला माल तयार करतील व त्यांत जरूर ती सुधारणाही करतील.

"हल्लीं आपल्या प्रांतांत सुमारें ४७५ वेगवेगळ्या प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्था काम करीत आहेत. यापैकी सुमारें निम्म्या संस्था गेल्या तीन चार वर्षांतच स्थापन झाल्या आहेत. या ४७५ संस्थांपैकी सुमारें २२० संस्था विणकरांच्या असून त्या हातमागावरील कापड तयार करीत आहेत. या संस्थांचें निर्माण होणारें कापड, लुगडीं वगैरे प्रत्येक सभासद परस्पर बाजारांत विकत असतो. वास्तविक पहातां हा सर्व माल सोसायट्यांनीं सामुदाईक पद्धतीनें एकत्र करून त्याची विक्री सोसायट्यांमार्फतच व्हावयास पाहिजे. परंतु अद्यापि तशी व्यवस्था झालेली नाहीं. हळूहळू त्याही दृष्टीनें प्रगति होत असून हा माल सहकारी संस्थांमार्फत लवकरच विकविला जाईल अशी अपेक्षा आहे."

**कापसाच्या वहातुकीसाठीं खास गाड्या**—यंदाच्या कापसाच्या हंगामाचें पीक नेण्यासाठीं जी. आय. पी. रेल्वेनें खास व्यवस्था केली आहे. रेल्वेच्या भुसावळ व नागपूर विभागांतून चालू सालीं ७,०३,५०० कापसाच्या गांठींची वहातूक करावी लागेल असा अंदाज आहे. हा कापूस मुंबई, अहमदाबाद आणि कानपूरला आणण्यासाठीं ७,०३५ वाघिणी लागतील. मुंबई आणि अहमदाबादमधील कापडाच्या गिरण्यांना मध्य प्रांतांतील कापूस नियमितपणें मिळून त्यांचें उत्पादन व्यवस्थित चालावें म्हणून कापसाच्या वहातुकीला प्राधान्य देण्यांत आलें आहे. त्यासाठीं शक्य तितक्या खास गाड्या सोडण्यांत येणार आहेत.

## परप्रांतांतील बातम्या

**बडोद्याला विद्यापीठ**— सरकारनें १९४७ मध्यें बडोदा विद्यापीठ कमिटीची नेमणूक केली होती. त्या कमिटीचा अहवाल आतां प्रसिद्ध झाला आहे. बडोद्याचें राजकीय भवितव्य कांहीं ठरलें तरी बडोद्याला स्वतंत्र विद्यापीठ लवकर निघणें अगदीं व्यवहार्य आहे असा अभिप्राय कमिटीनें आपल्या अहवालांत व्यक्त केला आहे. अशा विद्यापीठामुळें गुजराथमधील लोकांचा फायदा होईल अशी कमिटीची अपेक्षा आहे.

**वैद्यकीय शिक्षणांत सुधारणा**—वैद्यकीय शिक्षणाच्या सध्यांच्या कार्यक्रमांत बदल न करता प्रांतिक वैद्यकीय शिक्षणांत सुधारणा करण्यासाठी काय करतां येईल, तें सुचविण्यासाठी मद्रास सरकारनें तज्ज्ञांची एक कमिटी नेमली आहे.

**किमतीपेक्षां वहातुकीचा खर्च अधिक**—कलकत्त्याला अल्युमिनियमच्या गिरणीला लागणाऱ्या एका यंत्राचा भाग नुकताच विमानानें आणण्यांत आला. ह्या भागाचें वजन एक टनापेक्षांही अधिक होतें. त्या यांत्रिक भागाची जी किंमत होती तिच्यापेक्षां ७ पट अधिक खर्च तो भाग विमानानें आणण्यासाठी आला, असें समजतें.

**भाताच्या किडीवर उपाय**—मद्रास प्रांतांतील कांहीं भागांत भातावर कीड पडल्यामुळें चिंता उत्पन्न झाली होती. मद्रास सरकारच्या शेतकी खात्यानें ह्या किडीवर डी. डी. टी. चा उपयोग करून भात वाचवितां येतें, असें सिद्ध केलें आहे.

**विजयवाड्याला रेडिओ केंद्र**—ता. १ डिसेंबर, १९४८ पासून विजयवाडा ( बेझवाडा ) येथें नवें रेडिओ केंद्र सुरू करण्यांत आलें आहे. १५ ऑगस्ट, १९४७ नंतर देशांत नव्यानें सुरू केलेलें हें सातवें ध्वनिकेंद्र आहे.

**म्हैसूरमध्यें रेशमासाठी संशोधन-केंद्र**—म्हैसूर सरकारनें रेशमाच्या धंद्यासाठी एक संशोधन केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे संशोधन-केंद्रांत रेशमाचे निरोगी किडे तयार करणें, त्यांच्या कोषांना बाजारपेठ उपलब्ध करून देणें, इत्यादी खात्यांचाही अंतर्भाव होणार आहे. धंद्यांतील तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी तरुणांना परदेशीं पाठविण्यांत येणार आहे. म्हैसूर संस्थानामध्यें दरवर्षी १५ लाख पौंड रेशीम तयार होतें.

**सिमेंटच्या आयातीला बंदी**—परदेशांतून हिंदुस्थानांत सिमेंट आणण्यास परवाना न देण्याचें धोरण सिमेंट पॉलिसी कमिटीनें स्वीकारलें आहे. ह्या धोरणास अनुसरून मद्रास सरकारनें सिमेंटच्या व्यापाऱ्यांनीं परदेशांतून सिमेंटच्या मागण्या नोंदवूं नयेत अशी सूचना केली आहे.

**मद्रास प्रांतांतील धान्य वाटप**—मद्रास सरकारनें आपल्या प्रांतांतील कलेक्टरांना असा हुकूम सोडला आहे कीं, पिकांची कापणी-मळणी सुरू होतांच त्यांनीं धान्यवसुलीला सुरवात करावी. मद्रास प्रांतांत सर्व ठिकाणीं १ एप्रिल, १९४९ पासून शिधापद्धति अंमलांत येणार आहे, असें समजतें.

**ओरिसांत नवे उद्योगधंदे**—ओरिसाचें झपाट्यानें औद्योगीकरण करण्याचें धोरण त्या प्रांताच्या मुख्य प्रधानांनीं नुकतेंच जाहीर केलें. त्याप्रमाणें, प्रांतांत ताग आणि कृत्रिम रेशीम ह्यांच्या गिरण्या निघणार आहेत. हिराकुड धरणाजवळ दालमिया कंपनीनें एक सिमेंटचा कारखाना काढला आहे. हिराकुड धरण १९६० मध्यें पुरें होईल असा अंदाज आहे. भुवनेश्वर येथें ओरिसाची नवी राजधानी वसणार आहे. त्यासाठी सरकार जमिनी आपल्या ताब्यांत घेत आहे.

**वैद्यकीय उपकरणांचा कारखाना**—पूर्व पंजाब सरकार सोनपत येथील वैद्यकीय उपकरणांचा कारखाना अधिक वाढविण्याचा विचार करीत आहे. हीं उपकरणें तयार करण्यासाठी जे कारागीर लागतील त्यांना सरकारच्या उद्योगखात्यातर्फे शिक्षण देण्याचें ठरलें आहे.

**बंगलोरला वैमानिक शिक्षण**—बंगलोरजवळ जक्कूर येथें वैमानिकांना शिक्षण देण्याची शाळा उघडण्याचें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे. शाळेचें उद्घाटन हिंदुस्थानचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू चालू महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत करणार आहेत, असें समजतें. शाळेंत ग्राउंड एंजिनिअरिंग, एअर एंजिनिअरिंग आणि रेडिओ एंजिनिअरिंग ह्या विषयांचें शिक्षण दिलें जाईल.

**जंगली जनावरांसाठी राखीव जंगल**—संयुक्त प्रांत सरकारनें सहारणपूर विभागांत १०० चौरस मैलांचें अरण्य जंगली जनावरें सुरक्षित रहावीं म्हणून राखून ठेवण्याचें ठरविलें आहे. ह्या जंगलांत हिंदुस्थानचे पूर्वीचे व्हॉइसराय शिकारीसाठी जात असत.

## फॅक्टरी ॲक्टाची व्याप्ति : "ऑक्युपायर" वरील जबाबदारी

### मालकांवर परिणामकारक होणारा मुंबई हायकोर्टाचा ताजा निवाडा

मुंबई हायकोर्टानें अहमदाबाद येथील विक्रम मिलसच्या "ऑक्युपायर" ला फॅक्टरी ॲक्टाखाली ३०० रु. दंडाची नुकतीच शिक्षा केली, तिचेकडे कारखानदारांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. दिवसाच्या व रात्रीच्या दोन्ही पाळ्यांसाठी कांहीं कामगार कामावर ठेवल्याबद्दल फॅक्टरी ॲक्टाखाली गिरणीच्या मॅनेजरला अहमदाबादच्या फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटनें दोषी ठरविलें, परंतु "ऑक्युपायर" श्री. रमणलाल ह्यांचा गिरणींत कामगार लावण्याशी कांहीं संबंध नाहीं, असें सांगून श्री. रमणलाल ह्यांना सोडून दिलें. ह्या निकालावर सरकारनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें. फॅक्टरी ॲक्टाच्या तरतुदीप्रमाणें वागण्याचे कामीं श्री. रमणलाल ह्यांनीं ऑक्युपायर ह्या नात्यानें योग्य ती दक्षता बाळगली नाहीं, असा मुद्दा सरकारी वकिलानें हायकोर्टांत मांडला. "कामगार लावणें किंवा ते काढणें ह्याच्याशी माझा संबंध नाहीं. तें काम कंत्राटदारांकडे सोपविलेलें होतें" असा "ऑक्युपायर" श्री. रमणलाल ह्यांचा बचाव होता हायकोर्टानें खालच्या कोर्टाचा निकाल फिरवून, त्यांस वर लिहिल्याप्रमाणें ३०० रु. दंड केला. हायकोर्टाच्या ह्या निवाड्यामुळें मालक वर्गावर फार मोठी जबाबदारी पडत असून ती त्यांना कोणत्याहि कारणास्तव अंगाबाहेर टाकता येणार नाहीं.


श्री.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लिमिटेड.
९८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड,
पुणें २

**विनंति.**

ता. ७ फेब्रुवारी १९४९ चे सुमारास सिंडिकेटच्या भागिदारांकडे त्यांचीं डिव्हिडंड वॉरंट्‌स रवाना करण्यांत येतील. तरी ज्या भागिदारांचे पत्ते बदलले ... त्यांनीं आपले बदललेले पत्ते सिंडिकेटचे ऑफिसांत कळविण्याची विनंति आहे.

सी. जी. आगाशे आणि कंपनी
मॅनेजिंग एजण्टस.

## आपल्यापुढील कांहीं प्रश्न

(२)

१९४५–४६ च्या चढ पैशानेंहि हिंदुस्थानचें दर माणशीं वार्षिक उत्पन्न १९८ रु. पलीकडे जात नाहीं, तर इंग्लंड–अमेरिकेंतील आकडे अनुक्रमें २,३५५ रु, व ४,६६८ रु असे आहेत. श्रीमंत हिंदुस्थानांतील दरिद्री माणसाचें हें चित्र किती विदारक आहे!

### हें असें कां?

आपण काम कमी वेळ करतों; तेंहि सातत्यानें, नियमितपणानें करीत नाहीं. पद्धतशीरपणाचें काम, कष्टाचें काम आपल्या प्रकृतीला अपायकारक आहे ही कल्पना चुकीची आहे. कष्टाचीं कामें करूनही अमेरिकनांची आयुष्य मर्यादा हिंदी माणसांपेक्षां दुपटीनें आहे.

कष्टाशिवाय, कामांत व वागण्यांत अचूकपणा आल्याखेरीज आपण पैशाची आशा करण्यांत अर्थ नाहीं. काम करण्याबाबतचे आचार–विचारांत, कामाच्या वेळांत व कामाच्या पद्धतींत आमूलाग्र सुधारणा करणें निकडीचें आहे.

आपल्या राष्ट्राचा संसार भरभक्कम पायावर उभा करावयाचा असेल तर कष्ट करावयास तयार झालें पाहिजे. कष्टाशिवाय कांहीं होत नाहीं. सुबुद्ध तरुणांनीं आळशीपणा, निरुद्योगीपणा, रिकामटेकडेपणा हा राष्ट्रीय गुन्हा समजला पाहिजे. कष्ट करण्यास तयार होऊन उद्योग–धंद्यांत हिरीरीनें भाग घेतला पाहिजे. ह्यांतच राष्ट्राचा उद्धार आहे.

अमेरिकन समृद्धीची गुरुकिल्ली तेथील समाजजीवनांत व शिक्षणांत कार्यप्रवीणता, उद्योगप्रियता, सर्वांना समान संधि मिळविण्याची व्यवस्था आणि सेवाधर्म यांना देण्यांत आलेल्या महत्त्वांत व मूल्यांत आहे. हिंदी राष्ट्राकरितां हिंदुस्थान सरकारनें पक्षनिरपेक्ष राहून गुणी व अधिकारी मंडळींचा जरूर उपयोग करून घ्यावा. यशायशाचा पाठलाग करणें हें जाणून कोणत्याही कारणानें अपयश आपल्या पदरीं न येईल याची सरकारनें खबरदारी घ्यावी.

तरुण पदविधारांना विश्वासांत घेऊन सर विश्वेश्वरय्या म्हणाले, "जबाबदार नागरीक म्हणून राष्ट्राकरितां काम–कष्ट करा. एकजूट, आपुलकी, सहकार्य या भावना वागवा–जागवा. कामसूपणानें, शिस्तीनें व नीटनेटकें काम करण्यास शिका, निष्ठा बाळगा, सत्याची कास धरा. स्वार्थी बनूं नका. दैनंदिन जीवनांत आपल्या बरोबरीच्या मंडळींना आपल्या विनम्र, सौजन्यशील वागणुकीनें नि सेवाव्रतानें आपलेसें करा.

"अडचणीच्या प्रसंगीं शांतपणानें, धीरगंभीर वृत्तीनें वागा. जीवन संग्राम शौर्यानें लढा. चारित्र्य, शील, नांव हा आपला पवित्र ठेवा आहे याची जाणीव असूं द्या. आपला वेळ उपयुक्त कार्यांत व सत्कारणीं लावा आणि शेवटीं सांगावयाचें एकच–दैवावर हवाला न टाकतां कार्य करीत रहा, अविरत कष्ट करा."

—संजय

### शाकाहारी जेवणाची थाळी

अलाहाबादमार्गें कलकत्त्यास जाणाऱ्या व तेथून येणाऱ्या मेल गाड्यांच्या डायनिंग कारमध्यें शाकाहारी जेवण देण्यास २२ नोव्हेंबरपासून प्रारंभ झाला आहे. भात, चपाती, भाजी, आमटी, पापड, भजी, इत्यादींच्या थाळीस दर माणशी २ रुपये पडतात. आजाऱ्यांस व पडदानशीन स्त्रियांस डब्यांत थाळी मिळूं शकते.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

एक तपावर महाराष्ट्राची सेवा करीत असलेली

**– शेड्यूल्ड बँक –**

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | दोन कोटींचे वर |

**संचालक मंडळ**

श्री. धों. कृ. साठे (चेअरमन)
श्री. वा. पुं. वर्दे (व्हा. चेअरमन)

| | |
|---|---|
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पदमजी |
| श्री. मा. वि. शहा | श्री. शं. ल. किर्लोस्कर |
| श्री. भा. म. गुणे | श्री. मो. रा. ढमढेरे |

मुख्य कचेरी: लक्ष्मी रोड, पुणें २ } चिं. वि. जोग, मॅनेजर.

(पॅरेमाउंट लि.)







## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८३३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.